**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : २७ मार्च, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर लोकसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार नितीन गडकरी यांचा नामांकन अर्ज दाखल, तर रामटेकसाठी शिवसेना शिंदे गटाच्या राजू पारवे आणि महाविकास आघाडीच्या रश्मी बर्वे यांचं नामांकन**

2. **वंचित बहुजन आघाडीतर्फे लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर; नागपुरात कॉंग्रेस उमेदवाराला देणार समर्थन.**

3. **लोकसभा निवडणुकांसाठी शिवसेना-ठाकरे गटानं १७ उमेदवारांची पहिली यादी केली जाहीर; बुलढाणा आणि यवतमाळ-वाशिम मतदारसंघासाठी उमेदवारी घोषित**

**आणि**

4. **सार्वत्रिक निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास उद्यापासून होणार सुरुवात : महाराष्ट्रातील ८ मतदारसंघांचा समावेश.**

#####

**लोकसभा मतदारसंघ नामांकन**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या २८ मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येईल, तर ३० मार्च ही उमेदवारी अर्ज मागं घेण्याची शेवटची तारीख आहे. निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

नागपूर लोकसभा मतदार संघामधून भाजप तसंच महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, तर रामटेक लोकसभा मतदारसंघातून शिवसेना आणि महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांनी देखील आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. आज नामांकन अर्ज भरण्यापूर्वी गडकरी यांनी नागपूरच्या संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं आणि आकाशवाणी चौकात एका जाहीर सभेला संबोधित केलं. 'नागपूरमधून ७५ टक्के मतदान

करून पाच लाखाच्या मताधिक्यानं मला नागपूरची जनता निवडून देईल', असा विश्वास गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी सुधीर मुनगंटीवार, गडचिरोलीसाठी अशोक नेते तर भंडारा-गोंदिया मतदारसंघासाठी सुनील मेंढे हे महायुतीचे उमेदवार आहेत. नागपूरसाठी विकास ठाकरे हे महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातून काँग्रेस पक्षानं प्रदेश महासचिव डॉ. नामदेव किरसान यांना उमेदवारी दिली आहे. चंद्रपूर मतदारसंघातून प्रतिभा धानोरकर, भंडारा-गोंदिया मतदारसंघातून डॉ. प्रशांत पडोळे हे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणूक लढवतील. महाविकास आघाडीच्या नेत्या आणि काँग्रेसच्या रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार रश्मी बर्वे यांनी नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात आज नामांकन अर्ज भरण्याअगोदर एका जाहीर सभेला संबोधित केलं. याप्रसंगी काँग्रेसचे नेते सुनील केदार, नागपूर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र मुळक उपस्थित होते.

**वंचित बहुजन आघाडी**

वंचित बहुजन आघाडीनं लोकसभा निवडणुकीत ओबीसी महासंघाशी युती करणार असल्याचं जाहीर केलं आहे. पक्षाचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. अकोल्यातून आपण स्वत: निवडणूक लढवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. बुलढाणा मतदारसंघातून वसंत मगर, अमरावतीसाठी प्राजक्ता पिल्लेवान, चंद्रपूरसाठी राजेश बेले, भंडारा-गोंदिया मतदारसंघातून संजय केवट, गडचिरोली-चिमूरसाठी हितेश मडावी, वर्धा येथून राजेंद्र सांळुंके, तर यवतमाळ-वाशिम मतदारसंघातून खेमसिंग पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपुरात काँग्रेसला पाठिंबा देणार असल्याचं आंबेडकर यांनी सांगितलं.

दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत काल अनेक मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली असल्याचं आंबेडकर म्हणाले. मुस्लिम आणि जैन उमेदवाराला उमेदवारी दिली गेली पाहिजे, अशी चर्चा या बैठकीत झाली असल्याचं आंबेडकर म्हणाले.

**मतदान केंद्रावर सुविधा**

देशातल्या उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकरता सूचना जारी केल्या आहेत. उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्याकरता निवडणूक आयोगानं राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं जारी केलेल्या सूचनांची प्रत जारी केली आहे. मतदान केंद्रांवर

पिण्याचं पाणी आणि सावलीची सोय या किमान सुविधा पुरवण्याच्या सूचना आयोगानं दिल्या आहेत.

**शिवसेना -उद्धव बाळासाहेब ठाकरे + बाळासाहेब थोरात**

लोकसभा निवडणुकांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षानं आपल्या १७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानं उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येत असल्याचं खासदार संजय राऊत यांनी समाजमाध्यमातून स्पष्ट केलं. मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघातून अनिल देसाई यांच्या उमेदवारीची घोषणा करतानाच उर्वरित १६ उमेदवारांच्या नावांची यादी राऊत यांनी समाजमाध्यमातून जारी केली. त्यानुसार बुलढाण्यातून नरेंद्र खेडेकर, यवतमाळ-वाशिम मतदारसंघातून संजय देशमुख यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

विद्यमान खासदार भावना गवळी आणि संजय राठोड हे ठाकरेंची साथ सोडून शिंदे गटात सामील झाल्यानंतर पूर्वाश्रमीचे शिवसैनिक असलेले माजी मंत्री संजय देशमुख हे ठाकरेंच्या शिवसेनेत परतले. महाविकास आघाडीत यवतमाळ-वाशिम मतदारसंघ शिवसेना ठाकरे गटाकडं असल्यानं संजय देशमुख यांची उमेदवारी पक्षानं जाहीर केली आहे. देशमुख हे दोन वेळा दिग्रस मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले आहेत.

दरम्यान, ठाकरे गटाच्या या यादीवर काँग्रेसनं नाराजी व्यक्त केली आहे. सांगली आणि मुंबईतील ज्या जागांवर महाविकास आघाडीमध्ये चर्चा सुरू होती, तिथलेही उमेदवार ठाकरे गटानं जाहीर केले, असं काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे. आघाडीधर्माचं पालन सगळ्यांनीच केलं पाहिजे, असं आपलं मत असून, ठाकरे गटानं या जागांवर फेरविचार करावा, असंही थोरात यांनी म्हटलं आहे.

**मनसे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि महायुतीची चर्चा अद्याप सुरू असल्याचं मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी सांगितलं. आज मुंबईत पक्षाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. मनसेनं तीन जागा मागितल्या असून, दोन जागांवर चर्चा सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

**सार्वत्रिक निवडणूक दुसरा टप्पा**

सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या दुसऱ्या टप्प्यासाठी उद्यापासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील ८९ संसदीय मतदारसंघांसाठी राजपत्र अधिसूचना उद्या दिनांक २८ मार्च रोजी जारी केली जाईल. दुसऱ्या टप्प्यातील मतदान २६ एप्रिल रोजी होईल.

दुसऱ्या टप्प्यामध्ये आसाम, बिहार, छत्तीसगड, जम्मू आणि काश्मीर, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही राज्यं / केंद्रशासित प्रदेश आणि मणिपूरमधील एका संसदीय मतदारसंघामधील एक भाग बाह्य मणिपूर यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील हिंगोली, नांदेड, परभणी, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ -वाशिम या मतदारसंघांमध्ये दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**माध्यम सुविधा पोर्टल**

सार्वत्रिक निवडणुका 2024 साठी वार्तांकन करणाऱ्या माध्यमकर्मींसाठी पत्र सूचना कार्यालयानं pib.gov.in/elect2024/index ही वन स्टॉप सुविधा पोर्टल स्वरूपात माइक्रोसाईट सुरू केली आहे. या सुविधा पोर्टल अंतर्गत डिजिटल फ्लिप बुक असेल. यामध्ये विविध विश्लेषण आणि माहितीसमृद्ध वैशिष्ट्यं समाविष्ट आहेत. माध्यमकर्मी आपल्या लेखांसाठी ही माहिती वापरू शकतात.

संदर्भ म्हणून आणि माहितीचं सुलभ आकलन व्हावं, यासाठी विविध इन्फोग्राफिक्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या ठिकाणी भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिसूचनांबाबत अद्ययावत माहिती त्वरित अपलोड केली जात आहे.

**विशेष गाड्यांना मुदतवाढ**

उन्हाळी सुट्टी दरम्यान प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेत, दक्षिण मध्य रेल्वेनं विशेष गाड्यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. तिरुपती -अकोला-तिरुपती, तिरुपती-साईनगर शिर्डी-तिरुपती, हैदराबाद-जयपूर-हैदराबाद, पूर्णा-तिरुपती-पूर्णा या गाड्यांचा यात समावेश असून, सर्व गाड्यांना सुमारे दोन महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व गाड्या पूर्वीच्याच वेळापत्रकानुसार धावणार असल्याचं, दक्षिण मध्य रेल्वेच्या पत्रकात म्हटलं आहे.

**लेफ्टनंट जनरल एचएस काहलों**

महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्राचे जनरल कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट जनरल एचएस काहलों हे उद्यापर्यंत नागपूर आणि कामठी लष्करी आस्थापनांच्या भेटीवर आहेत. या भेटीदरम्यान, मेजर जनरल एस के विद्यार्थी यांनी उपक्षेत्राच्या विविध उपक्रमांबद्दल काहलों यांना माहिती दिली. मदत आणि आपत्ती निवारण, माजी सैनिकांसाठी कल्याणकारी उपक्रम, नागरिकांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या सीताबर्डी किल्ल्याच्या हेरिटेज टूर आणि पायाभूत सुविधांच्या विकास योजनांमध्ये, उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात मुख्यालय उपक्षेत्र सक्रिय असल्याचं ते म्हणाले.

**सियुईटी-युजी**

सियुईटी- युजी- २०२४ साठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. उमेदवार आणि इतर संबंधितांच्या विनंतीनंतर हा निर्णय घेतल्याची माहिती युजीसीचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी दिली. ही परीक्षा ३८० शहरांमध्ये घेतली जाणार असून यामध्ये भारताबाहेरच्या २६ शहरांचा समावेश आहे.

**उन्हाळी परीक्षा-अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या २०२४ च्या उन्हाळी परीक्षांची घोषणा परीक्षा विभागाकडून करण्यात आली आहे. सर्व परीक्षा २९ एप्रिल पासून सुरू होणार असून सी.बी.सी.एस., एन.ई.पी. अभ्यासक्रमाच्या परीक्षा तसंच शासनस्तरावर प्रवेश होणा-या अभ्यासक्रमांच्या व्दितीय सत्रांच्या परीक्षा दिनांक ५ जूनपासून सुरू होणार आहेत. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसंच अडचणींबाबत परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या प्रभारी संचालक यांच्याशी संपर्क साधावा, असं आवाहन विद्यापीठाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**हवामान**

दिनांक २७ मार्च ते २ एप्रिल दरम्यान नागपूर जिल्ह्यात आकाश अंशतः ढगाळ राहील. या दिवसांमध्ये नागपूरचं कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २४ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. दिनांक २७ मार्च ते २ एप्रिल दरम्यान विदर्भात सर्वत्र आकाश अंशतः आभ्राच्छादित राहणार असून वर्धा, अकोला आणि वाशीम इथं उष्णतेच्या झळांसोबत तापमान ४३ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या दरम्यान भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या भागात हलक्या सरींची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे.

#####